# पदविका अभियांत्रिकीचे प्रवेशही ऑनलाइन

**या वर्षीपासून शासकीय, शासकीय अनुदानित, तसेच विनाअनुदानित तंत्रनिकेतनांसाठी केंद्रीय पद्धतीने प्रवेशप्रक्रिया ऑनलाइन स्वरूपात राबविली जाते आहे. विद्यार्थ्यांनी गोंधळून न जाता ही ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया व्यवस्थितपणे समजावून घेऊन याबाबत प्रक्रिया पूर्ण करावी. विशेष म्हणजे या प्रवेशप्रक्रियेसाठी आरक्षणे लागू असतात.**

**महेश नरके**

देशाच्या व राज्याच्या प्रगतीची मदार शेतीबरोबरच उद्यम जगतावरही आहे. औद्योगिक आस्थापनांमध्ये साधारणतः तीन पातळ्यांवर कुशल अशा तांत्रिक मनुष्यबळाची गरज भासते. 'रिसर्च अँड डेव्हलपमेंट' या सर्वसमावेशक तरीही विशिष्ट अशा कार्यक्षेत्रासाठी आयआयटी / एनआयटीसारख्या संस्था उच्च बुद्धिमत्तेच्या विद्यार्थ्यांना अत्यंत स्पर्धात्मक प्रक्रियेद्वारा निवडून तयार करतात. संशोधन, पुनर्संशोधनाच्या अनेक फेऱ्यांनंतर अंतिम निश्चिती लाभलेल्या उत्पादनांसाठीची निर्मितीप्रक्रिया कार्यक्षमरीत्या नियोजित करणे आणि राबविणे, हे काम इतर शासकीय, तसेच खासगी अभियांत्रिकी महाविद्यालयांतून पदवीप्राप्त अभियंते करतात. तर ही उत्पादनप्रक्रिया नेमून दिलेल्या मापदंडानुसार विनाव्यत्यय सुरू ठेवणे, या प्रक्रियेमध्ये सक्रिय सहभाग घेणे, या प्रक्रियेसाठीची कुशल तंत्रज्ञाची गरज पूर्ण करणे पदविका अभियंत्याकडून अपेक्षित असते. अनेक उद्योगांमध्ये वापरले जाणारे आधुनिक तंत्रज्ञान आणि स्वयंचलित उत्पादन व्यवस्थांची वाढती लोकप्रियता पदविका अभियंत्यांची रोजगारक्षमता अधोरेखित करतात.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण महामंडळाच्या आधिपत्याखाली (३ वर्षे कालावधीच्या) पदविका अभियांत्रिकीची शिक्षण व्यवस्था राबविली जाते. पदविका उपलब्ध असणाऱ्या संस्थांची वर्गवारी पुढीलप्रमाणे :

**कालावधी - ३ वर्षे,**
**पात्रता : दहावी**

स्वायत्त तंत्रनिकेतने वगळता इतर संस्थांसाठी अभ्यासक्रम रचना आणि परीक्षा पद्धतीची जबाबदारी राज्य तंत्रशिक्षण महामंडळावर असते.

या संस्थांमधून ७७ विद्या शाखांचे पर्याय विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध आहेत.

**पान ३ वर ▶**

# पदविका अभियांत्रिकीचे प्रवेशही ऑनलाइन

**▶ पान १ वरून**

विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून २७ इतर विद्या शाखांसाठी विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात.

**प्रवेशपात्रता :** दहावी,

**गुणमर्यादा :** ५० टक्के (मागासवर्गीयांसाठी ४५ टक्के)

**प्रवेशप्रक्रिया :** या वर्षीपासून शासकीय, शासकीय अनुदानित, तसेच इच्छुक विनाअनुदानित तंत्रनिकेतनासाठी केंद्रीय पद्धतीने प्रवेशप्रक्रिया ऑन लाईन स्वरूपात राबविली जाते आहे. या प्रवेशप्रक्रियेसाठी आरक्षणे लागू असतात. दहावीच्या निकालानंतर लगेचच प्रमुख वृत्तपत्रांमधून, तसेच डीटीईच्या संकेतस्थळावर त्यासंबंधीची अधिसूचना जारी होणार आहे.

**या प्रवेशप्रक्रियेचे महत्त्वाचे टप्पे :**

१) ॲप्लिकेशन रिसिप्ट सेंटरवर जाऊन माहितीपत्रक मिळविणे.
२) ऑन लाईन उपलब्ध असलेला ॲप्लिकेशन फॉर्म भरणे.
३) प्रवेशप्रक्रियेसाठी पात्र उमेदवारांनी ॲप्लिकेशन रिसिप्ट सेंटरवर जाऊन ॲप्लिकेशन फॉर्म कन्फर्म करणे, तसेच कागदपत्रांची छाननी करून घेणे.
४) ज्या उमेदवारांनी ऑन-लाईन फॉर्म भरून एआरसीवर कन्फर्म केला आहे, अशा उमेदवारांची मेरिट लिस्ट डिटीईच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाईल. (http:// www.dte.org.in/ poly२००९).
५) जे उमेदवार 'कॅप' (सेंट्रलाईज्ड ॲलॉटमेंट प्रोसेस) राऊंड १-२-३ साठी पात्र असतील, अशा विद्यार्थ्यांनी ऑन-लाईन पद्धतीने ऑप्शन फॉर्म भरावेत व एआरसीवर जाऊन कन्फर्म करावेत.
६) प्रत्येक 'कॅप राऊंड'नुसार 'ॲलॉटमेंट लिस्ट' संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाणार आहे.
७) ॲलॉटमेंट झाल्यानुसार उमेदवारांनी महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे. (यासाठीचे नियम लक्षपूर्वक पाहावेत)
८) कॅपचा चौथा राऊंड काऊन्सेलिंग पद्धतीने शिल्लक जागांसाठी पार पडणार आहे.

वरील सर्व टप्प्यांचे वेळापत्रक, तसेच एआरसीची यादी अधिसूचनेमध्ये देण्यात येईल.

तसेच माहितीपत्रकामध्ये प्रवेश प्रक्रियेत भाग घेणाऱ्या सर्व संस्थांची यादी, तसेच संपूर्ण नियमावली सादर करण्यात येईल.

दहावीच्या निकालानंतर लगेचच ही प्रक्रिया सुरू होत असल्यामुळे विद्यार्थी-पालकांनी विद्याशाखा व तंत्रनिकेतनांची माहिती घेणे क्रमप्राप्त आहे. या माहितीकरिता पुढील संकेतस्थळे उपयुक्त ठरू शकतील.

www.dte.org.in

**शुल्क :** शासकीय / शासकीय अनुदानित तंत्रनिकेतने- अंदाजे रु. ७७५०

**विनाअनुदानित तंत्रनिकेतने :** शिक्षण शुल्क समितीने ठरवून दिल्यानुसार.

**शुल्क सवलत :** आरक्षणाची सवलत असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता 'शिकवणी फी' माफ असते. शासकीय व अनुदानित तंत्रनिकेतनामध्ये भरावे लागणारे इतर शुल्क अंदाजे रु. १७५०/-

विनाअनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये ही शुल्क सवलत लागू असून, इतर शुल्काची रक्कम मात्र तंत्रनिकेतनानुसार वेगवेगळी असू शकते.

डिप्लोमानंतर पुढे काय? पदविका अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या आणि उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (गुणांची अट ६० टक्के, स्वायत्त महाविद्यालयांकरिता ६५ टक्के) पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षासाठी केंद्रीय पद्धतीने ऑन-लाईन प्रवेश उपलब्ध आहेत. थेट द्वितीय वर्ष पदवी प्रवेशप्रक्रियेसाठी आरक्षणाचे कोणतेही नियम लागू होत नाहीत. प्रत्येक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी ग्रहण क्षमतेच्या १/६ जागा पदविकाप्राप्त विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवलेल्या असतात. काही महाविद्यालयांमधून अर्ध वेळ पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमही उपलब्ध आहे.

अर्ध वेळ पदविका, आयटीआय, तसेच व्होकेशनल विषयांसह बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश आदी पर्यायही संबंधित विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध आहेत.